नवोपक्रम अहवाल

शैक्षणिक सत्र २०२२ – २०२३

“ बालचित्रकाव्य”


✻ सादरकर्ती ✻

कु. रेणुका कमलाकर कथलकर

(सहाय्यक अध्यापिका )

जि. प. उच्च प्राथमिक केंद्रशाळा, बोरगाव

केंद्र बोरगाव पं. स. आष्टी जि. वर्धा





## ✼ स्पर्धकाची माहिती ✼

| | | |
|---|---|---|
| स्पर्धकाचे नाव | : | कु. रेणुका कमलाकर कथलकर |
| शाळेचे नाव | : | जि. प. उच्च प्राथमिक केंद्रशाळा, बोरगाव केंद्र बोरगाव पं. स. आष्टी जि. वर्धा |
| जन्म दिनांक | : | २ जानेवारी, १९८३ |
| शैक्षणिक अर्हता | : | एम. ए. बी. एड. |
| शासकीय सेवेत रुजू दिनांक | : | १० ऑक्टोबर, २००५ |
| अध्यापन अनुभव | : | १७ वर्षे |
| नवोपक्रम शीर्षक | : | “बालचित्रकाव्य ” |

# ✲ ऋणनिर्देश ✲

आभार हा सोपस्कार नाही, ती एक भावना आहे. नवोपक्रम जेव्हा विद्यार्थ्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणतात, तेव्हाच तो यशस्वी झाला असे मानता येईल. नवोपक्रमाच्या यशस्वीतेसाठी ज्या दृश्य आणि अदृश्य घटकांनी सहाय्य केले, त्यांची मी आभारी आहे.

प्रस्तुत नवोपक्रमाचे अहवाल लेखन करतांना ज्यांनी मला सहकार्य केले, अशा सर्वांचे आभार मानणे, हे माझे आद्य कर्तव्य आहे. कोणत्याही उपक्रमाची फलश्रुती ही सहकार्य, समायोजन व सहिष्णुता या मूल्यांच्या आधाराशिवाय होऊच शकत नाही. माझ्या शाळेतील मा. केंद्रप्रमुख व मुख्याध्यापक मा. श्री. लक्ष्मीकांत काकपुरे सर, विषय शिक्षक मा. श्री. मानापुरे सर, सहाय्यक अध्यापिका मा. कु. गायत्री भेंडेकर व मा. कु. जोत्स्ना भोंड या सर्वांनी वेळोवेळी सहकार्य करून या उपक्रमाला प्रोत्साहन दिले. सर्वांचे आवडते मा. गटशिक्षणाधिकारी श्री. देशपांडे साहेब, वेळोवेळी उपक्रमाच्या यशस्वीतेबद्दल विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेविषयी विचारणा करीत असत. त्यांचे सुद्धा मला या नवोपक्रमाला बहुमुल्य सहकार्य लाभले. या सर्वांचे मी मनःपूर्वक आभार मानते.

या नवोपक्रमाचे मुख्य केंद्रबिंदू म्हणजे माझे विद्यार्थी ज्यांच्या मदतीमुळे आणि निस्वार्थी प्रेमामुळेच हा नवोपक्रम पूर्णत्वाकडे जाऊ शकला, अशा सर्वांचे मी आभार व्यक्त करते.

माझ्या प्रत्येक यशात सिंहाचा वाटा असलेले माझे पती व चि. स्वर्णिम ह्याचा फार मोठा वाटा आहे. तसेच प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे ज्यांचे सहकार्य या नवोपक्रमास लाभले, अशा सर्वांचे मनःपूर्वक आभार!



आपलीच सहकारी मैत्रीण
कु. रेणुका कमलाकर कथलकर





# * अनुक्रमणिका *


- नवोपक्रमाची प्रस्तावना, गरज व महत्व
- नवोपक्रमाची उदिष्ट्ये
- नवोपक्रमाचे नियोजन
- नवोपक्रमाची कार्यपद्धती
- नवोपक्रमाची यशस्विता
- नवोपक्रमाची व्याप्ती व मर्यादा
- समारोप
- संदर्भ सूची व परिशिष्टे





# ✻ बालचित्रकाव्य ✻

**नवोपक्रमाची गरज व महत्व:**

**१) उपक्रम निवडण्याचे कारण:**

गेल्या दोन वर्षातील कोविड – १९ विषाणूमुळे फक्त विद्यार्थीच नव्हे तर प्रत्येक वयोगटातील व्यक्ती निरोगी आणि संपन्न जीवनासाठी धडपडतांना दिसला. या कालावधीत विद्यार्थ्यांचे न भरून निघणारे नुकसान झाले. भरपूर नवीन गोष्टी जगाला नव्याने शिकायला मिळाल्या नि पुष्कळ जुन्या परंपरा आणि चालीरीती जगण्यासाठी बाजूला ठेवाव्या लागल्या. ग्रामीणच नव्हे तर तर शहरातील विद्यार्थ्यांचे पालकसुद्धा नवीन कामाच्या शोधात नव्या उमेदीने भरकटतांना दिसले. या सर्व चढाओढीत आपला लहानग्या विद्यार्थ्यांच्या दैनंदिन जीवनात कार्य, शिक्षण, अभ्यास, शिस्त, शैक्षणिक खेळ, उपक्रम, अनुभव, आरोग्य, इच्छा – अपेक्षांची हेळसांड होतांना दिसली.

सर्व विद्यार्थी शाळेत न येता वरच्या वर्गात पोचले. असे असतांना दोन वर्षांपासून प्रत्यक्ष (Serious) अभ्यासापासून दूर राहिलेला विद्यार्थी या शैक्षणिक वर्षात आकलनासह वाचन करू शकणार? त्याचे अभ्यासात मन लागणार? न अडखळता पाढे म्हणू शकणार? हातच्याची बेरीज – वजाबाकी करू शकणार? असे नानाविध प्रश्न माझ्यासमोर उभे राहिले.

माझ्या विद्यार्थ्यांच्या आत्माविश्वाला बळकटी देण्यासाठी, त्यांना शैक्षणिक प्रवाहात सामील करून घेण्यासाठी, त्यांचा भावनिक, मानसिक, शारीरिक, सामाजिक विकास साधण्यासाठी आणि शैक्षणिक प्रवाहात रुजविण्यासाठी काहीतरी नवीन आणि विशेष प्रयत्नांची आवश्यकता होती. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास साधण्याच्या हेतूने नाविण्यपूर्ण उपक्रम राबविण्याची गरज होती. त्यासाठी विद्यार्थ्यांना खेळीमेळीच्या व मनोरंजनात्मक पद्धतीने शिक्षण देण्यासाठी **'बालचित्रकाव्य'** हा उपक्रम निवडण्यात आला व विद्यार्थ्यांसाठी तो राबविण्यात आला.

**२) उपक्रमाचे वेगळेपण व उपयुक्तता:**

विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेला चालना देण्यासाठी चार भिंतीच्या आत शिक्षण म्हणजे पंख फुटलेल्या पिल्लांना अफाट पसरलेले नभ आणि निसर्ग दूरदर्शनवर दाखविण्यासारखे आहे. त्यांना प्रत्येक घटकांचा अनुभव स्वत: घेता यावा. यासाठी अध्ययन निष्पत्तीला व अध्ययन घटकांना अनुसरून स्वानंदात खेळाच्या माध्यमातून व मनोरंजनात्मक पद्धतीने विद्यार्थ्यांना नवोउपक्रमात सहभागी करून त्यांना शैक्षणिक प्रवाहात उत्साहाने रुजवून घेणे या उपक्रमामुळे शक्य झाले. विद्यार्थीही आनंदाने या उपक्रमात सहभागी झाले.

दिलेल्या मुळ विषय आणि शब्दाशी सबंधित स्वानुभवाने फक्त चार ओळी काव्य स्वरुपात लेखन म्हणजेच **बालचित्रकाव्य** करणे व त्या प्रत्येक शब्दांचा आपल्या स्वतःच्या लयीत, यमक साधत भाषेतील शब्दांची किमया आणि सामर्थ्य अनुभवत आकलनासह काव्यपंक्ती लिहिणे. याद्वारे विद्यार्थ्यांची शब्दसंपत्ती वाढविणे, व्याकरणशुद्ध लेखन, सुंदर हस्ताक्षर, विचारशक्ती, अनंत कल्पनाशक्ती, आकलन क्षमता, स्मरणशक्तीला चालना देणे – वाढविणे आणि मुख्य म्हणजे भाषावैभव हेच या उपक्रमाचे वेगळेपण आहे.

**नवोपक्रमाची उदिष्ट्ये:**

१) विद्यार्थ्यांना शैक्षणिक प्रवाहाशी जुळवून घेणे.
२) आनंदमयी व खेळीमेळीच्या वातावरणात अध्ययन अनुभव देणे.
३) अध्ययन निष्पत्तीनुसार शाब्दिक प्रगती साधणे.
४) विद्यार्थ्यांच्या निरीक्षण क्षमतेला गती आणि काटेकोरपणा वाढविणे.
५) विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाला चालना देणे.
६) सहज निरीक्षणातून काव्यनिर्मिती संकल्पना वाढीस लावणे.
७) भाषेतील शाब्दिक सामर्थ्य, मनोबल व संग्रह वाढविणे.
८) विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती व निरीक्षणशक्ती वाढविणे.
९) शब्दांच्या उपयोजनातून त्यांचे भावनिक विकास व आत्मविश्वास बळकट करणे.
१०) मोबाईल-टी.व्ही याशिवाय प्रत्यक्ष अनुभव, भाषिक सौंदर्य, वाचन, लेखन, मनन यांसारख्या शैक्षणिक उक्रमात आनंद घेण्याची संधी उपलब्ध करून देणे.
११) विद्यार्थ्यांच्या वैचारिक शक्तीला व आकलन-उपयोजन क्षमतेला चालना देणे.
१२) व्याकरणशुद्ध लेखन व सुंदर हस्ताक्षर आवड निर्माण करणे.

**नवोपक्रमाचे नियोजन:**

नवोपक्रम प्रत्यक्ष राबविण्यासाठी आधी त्याबाबत पूर्वतयारी व नियोजन करणे आवश्यक होते. त्यासाठी खालील बाबींवर सखोल विचार करण्यात आला.

**अ) उपक्रम पुर्वस्थितीचे निरीक्षण:**

नवीन पाठ्यपुस्तके-नवीन अभ्यासक्रम आणि उत्साहाचे वातावरण जरी असले तरी वाचन, लेखन, संभाषण, पाढे म्हणणे, स्वाध्याय सोडविणे व तसेच मागील वर्षीचा अफाट सेतू अभ्यासक्रम कमी कालावधीत पूर्ण करून दोन चाचण्या यशस्वी पार पाडणे हे विद्यार्थ्यांसमोर असलेले भयंकर आव्हान होते. त्यातच लिहिण्या-वाचण्याचा वेग मंदावलेला, स्वाध्याय सोडवताना विद्यार्थ्यांना येणारा कंटाळा, अपूर्ण स्वाध्याय सोडविल्या मुले विद्यार्थ्यांचे धासलेले मनोबल आणि आत्मविश्वास, ग्रामीण भाग असल्याने आर्थिक दुर्बलतेला सामोरे जाणारे पालक असे चित्र स्पष्ट डोळ्यासमोर होते.

**आ) संबंधित व्यक्तींशी व तज्ञांशी चर्चा:**

प्रथम नवोपक्रम राबविण्याबाबत मा. श्री. प्रमोद देशपांडे गटशिक्षणाधिकारी पं. स. आष्टी व मा. श्री. लक्ष्मीकांत काकपुरे केंद्रप्रमुख केंद्र बोरगाव यांच्याशी चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांचा वयोगट, त्यांची शब्दसंपत्ती, उपक्रमासाठी देण्यात येणारे विषय, शक्षणिक गुणवत्तेत व अभ्यासिक व्यासंगात होणारी प्रगती, इतर विषयांवर या उपक्रमाचा होणारा सकारात्मक परिणाम, तसेच विविध मर्यादांची काळजी घेऊन उपक्रम राबविता येईल असे सुचविण्यात आले. मा. श्री. मा. श्री. लक्ष्मीकांत काकपुरे मुख्याध्यापक, मा. श्री. मानापुरे सर वि.शि. व मा. कु. भेंडेकर स.अ. व कु. भोंड स.अ. यांच्याशी शाळेत सभा घेऊन पालकांची संमती घेण्यात आली.

**इ) आवश्यक साधनांचा विचार:**

उपक्रम राबविण्यासाठी संगणक, प्रिंटर व पेपर उपलब्ध करून विषयांच्या यादीनुसार तयार करण्यात आले.

**ई) केलेल्या कृतींचा क्रम:**

१) वरिष्ठ अधिकारी व तज्ञांशी चर्चा व सल्ला मसलत करणे.

२) शाळेतील मा. मुख्याध्यापक, सहकारी अध्यापक व पालकांशी चर्चा व सहमती घेणे.

३) नवोपक्रमाला उचित नियोजन व पेपर स्वरुपात तयार करणे.

४) विद्यार्थ्यांना लघुकाव्य, यमक, व शब्दांचे उपयोजन याबाबत मार्गदर्शन करणे.

५) विद्यार्थ्यांच्या अडचणींबाबत चर्चा व मार्गदर्शन करणे.

६) पेपर जमा करणे, तपासणे व मार्गदर्शन करणे.

**उ) उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण करणे.**

**नवोपक्रमाची कार्यपद्धती :**

**अ) वेळापत्रक**

| **अ.क्र.** | कालावधी | तपशील |
|---|---|---|
| १ | जुलै | नवोपक्रमाची निवड करणे. |
| २ | ऑगस्ट | चर्चा, मार्गदर्शन व सहमती घेणे, साहित्य निर्मिती, नवोपक्रमाची सुरवात करणे. |
| ३ | सप्टेंबर | साहित्य वितरीत करणे, सोडवून घेणे. जमा करणे व तपासणे. |
| ४ | ऑक्टोबर | जमा करणे व तपासणे. यशस्विता ठरविणे व अहवाल लेखन इत्यादी. |

**आ) प्रत्यक्ष कार्यवाही:**

सर्वप्रथम विद्यार्थ्यांच्या पालकांची सभा घेऊन नवोपक्रम समजून देण्यात आला. उपक्रम प्रत्यक्ष कार्यवाहीत आणण्यासाठी विद्यार्थ्यांच्या सभोवतालचे वातावरण आनंदी व प्रसन्न असावयास हवे हे त्यांना सुचविण्यात आले. प्रत्येक विद्यार्थ्याला दर आठवड्याला शनिवारी त्यांच्या आवडीनुसार एका विषयाची शीट

(पेपर) देणे व आधी सोडविलेला पेपर घेणे. याप्रमाणे आठ आठवडे खालील आठ विषय देण्यात आले. काही विद्यार्थ्यांची गती लक्षात घेता त्यांना आणखी दोन किंवा तीन विषय जास्त देण्यात आले.

| अ.क्र. | मूळ विषय | काव्य निर्मितीसाठी दिलेले विषय | संख्या |
|---|---|---|---|
| १ | **निसर्ग** | पाऊस, झाडे, नदी, सूर्य, डोंगर, जंगल | ६ |
| २ | **नातेसंबंध** | भाऊ–बहिण, माझी आई, माझे बाबा, मामा, आजोबा–आजी, मैत्री | ६ |
| ३ | **उत्सव** | होळी, दिवाळी, नववर्ष, माझा नंदी, सांता क्लाज, गावातील जत्रा | ६ |
| ४ | **आवडीचे पदार्थ** | लाडू, बासुंदी, जिलेबी, गुलाब जामून, आंब्याचा रस, श्रीखंड | ६ |
| ५ | **सखे–सोबती** | सर्जा राजा, ड्रायव्हर काका, गुराखी, सैनिक, चित्रकार, कुंभार | ६ |
| ६ | **प्राणी** | गाय, बैल, सिंह, वाघोबा, माकड, कुत्रा | ६ |
| ७ | **माझे अवयव** | डोळे, जीभ, कान, दात, पोट, हात | ६ |
| ८ | **फळे** | आंबा, चिंच, सफरचंद, पपई, लिंबू, मोसंबी | ६ |
| ९ | **वस्तू** | कप, मोबाईल, गणवेश, पेन्सील, चपला, छत्री | ६ |
| १० | **ठिकाण** | माझी शाळा, माझे गाव, माझे शेत, माझे घर, माझे अंगण, बाजार | ६ |
| ११ | **वाहने** | सायकल, बैलगाडी, एस.टी. बस, आगगाडी, विमान, जहाज | ६ |

विद्यार्थी सदर नवोपक्रमात उत्साहाने आणि स्वयंप्रेरणेने सहभागी झाले. सर्व विद्यार्थ्यांनी यशस्वीपणे उपक्रम पूर्ण केला. उपक्रमा दरम्यान विद्यार्थ्यांना व्यक्तिशः त्यांच्या अडचणी असल्यास त्या सोडविण्यात आल्या व आवश्यक तेथे मार्गदर्शन करण्यात आले. यात स्वयंप्रेरणेने कु. भेंडेकर स. अध्यापिका यांची निरीक्षक म्हणून मदत घेण्यात आली.

### इ) कार्यवाही दरम्यान केलेली निरीक्षणे व माहितीचे संकलन:

उपक्रमादरम्यान पालक व विद्यार्थ्यांशी चर्चा करण्यात आली. त्यांच्या प्रतिसादाच्या व निरीक्षणाच्या नोंदी घेण्यात आल्या.

### ई) उपक्रम पूर्ण झाल्यावर केलेले निरीक्षण व मुल्यमापनात्मक नोंदी:

उपक्रम पूर्ण झाल्यावर विद्यार्थ्यांना व पालकांना या उपक्रमाचा झालेला फायदा व त्यांचा सकारात्मक आणि नकारात्मक प्रतिसाद यांच्या नोंदी घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांच्या मुल्यमापनात्मक नोंदी घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आपण काहीतरी नवीन आणि वेगळे केले याचे मनस्वी समाधान आणि स्वानंद दिसत होता हे त्यांच्या मुल्यमापनावरून दिसून येते. या कालावधीत त्यांच्या हस्ताक्षरांत आमुलाग्र सुधारणा झाली. टी. व्ही. आणि मोबाईल सोडून त्यांचा उपक्रमादरम्यानचा कालावधी काव्यमय झाला. खेळतांना सुद्धा ते काहीतरी नवीन काव्यपंक्ती गुणगुणत आढळले.

### उ) माहितीचे विश्लेषण:

शैक्षणिक सत्र २०२२–२३ मध्ये इयत्ता ५ वी मधील २० विद्यार्थ्यांपैकी १७ विद्यार्थ्यांना उपक्रमाचा चांगला फायदा झाला.

शैक्षणिक सत्र २०२२-२३ मध्ये इयत्ता ६ वी मधील २० विद्यार्थ्यांपैकी १६ विद्यार्थ्यांना उपक्रमाचा चांगला फायदा झाला.

शैक्षणिक सत्र २०२२-२३ मध्ये इयत्ता ७ वी मधील ८ विद्यार्थ्यांपैकी ६ विद्यार्थ्यांना उपक्रमाचा चांगला फायदा झाला.

**नवोपक्रमाची यशस्विता:**

१) उपक्रमात सहभागी सर्वच विद्यार्थ्यांना नवोपक्रमाचा चांगला फायदा झाला. त्यांचे श्रेणीनिहाय मूल्यमापन करून निकाल देण्यात आला.

२) विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनाची व निरीक्षणाची सवय लागली.

३) विद्यार्थ्यांच्या मनात स्वतःच्या भावना शब्दांत व्यक्त करण्याची आवड निर्माण झाली.

४) विद्यार्थी अध्ययन घटकांचे, परिसराचे, आणि दिलेल्या विषयाचे आकलन करू लागले.

५) विद्यार्थ्यांची स्मरणशक्ती, आकलनशक्ती आणि निरीक्षणशक्ती वाढीस लागली.

६) विद्यार्थ्यांचे लेखन शिस्तबद्ध व सुंदर हस्ताक्षयुक्त होण्यास मदत झाली.

७) विद्यार्थ्यांचा शब्दसंग्रह वाढला. यमक साधण्याचे तंत्र कसे साधावे हि संकल्पना त्यांना समजली आणि उमजली.

८) विद्यार्थी विविध विषयांचे वेगळ्या पद्धतीने विचार करावयास लागले.

९) विद्यार्थ्याला वाचनाची व व्याकरणशुद्ध लेखनाची सवय लागली.

१०) विद्यार्थ्यांचा मानसिक व बौद्धिक विकास झाला. आता ते नवीन विषयांचे चित्रकाव्य स्वतःहून तयार करू लागले.

११) पालक आणि शिक्षक सुद्धा विद्यार्थ्यांची अध्ययनाच्या गतीत प्रगती झाल्याने समाधानी झाले.

**नवोपक्रमाची व्याप्ती व मर्यादा:**

सदर उपक्रम हा इयत्ता ५ वी व त्यावरील विद्यार्थ्यांच्या वयोगटासाठी अधिक चांगल्या प्रकारे उपयुक्त ठरू शकतो. या वयोगटातील विद्यार्थ्यांची शाब्दिक संपत्ती बऱ्यापैकी विकसित झालेली असते व ते शब्दांचा उपयोग त्यांच्या भावना व्यक्त करण्यासाठी करू शकतात. आमच्या केंद्रातील विविध शाळेमध्ये मा. केंद्रप्रमुखांच्या सूचनेनुसार हा उपक्रम आवडीने राबविण्यात आला.

मात्र इयत्ता १ ली ते ४ मधील कुशाग्र बुद्धीमत्तेचे विद्यार्थी वगळता सदर नवोपक्रम यशस्वीरीत्या राबविणे थोडे कठीण जाईल. तसेच योग्य चित्रांचा शोध आणि वापर करणे, संगणकाच्या सहाय्याने पेपर तयार करणे, प्रिंट काढणे थोडे खर्चिक होऊ शकते.

**समारोप:**

"**बालचित्रकाव्य**" या नवोपक्रमामुळे विद्यार्थी, पालक व शिक्षक शिक्षण प्रवाहात गुंतून राहिल्याने विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीस गती मिळाली. हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या शिक्षणातच नव्हे तर त्यांच्या निरीक्षण क्षमता, स्मरण शक्ती, शब्द संपत्ती, शाब्दिक सामर्थ्य, त्यांची वैचारिक क्षमता वाढीस लागली. या उपक्रमामुळे विद्यार्थी फावल्या वेळेचा सदुपयोग कसा करावा हे शिकले. त्यांच्या दैनंदिन शैक्षणिक प्रगतीत खंड न पडता श्रवण, भाषण, वाचन, लेखन, मनन, आकलन, उपयोजन, संभाषण ही भाषिक कौशल्ये आणखी विकसित होत गेली. फक्त कवितेतच नव्हे तर स्वतःच्या लहान काव्यात सुद्धा यमकाचा चांगल्या प्रकारे उपयोग होऊ शकतो, याची त्यांना जाणीव झाली. पाठ्यपुस्तकातील कवितेच्या प्रत्येक ओळींकडे व त्यातील शब्दांच्या उपयोजनाकडे बारकाईने बघू लागले. अभ्यासाची आवड निर्माण झाली. हस्ताक्षर सुधारणेकडे वळू लागले. एखाद्या विषयावर सखोल विचार व निरीक्षण करण्याची त्यांना सवय लागली. स्वतः नवीन विषय शोधून त्यावर लघुकाव्य तयार करू लागले. त्यांच्या व्यक्तिमत्व विकासाच्या दृष्टीने उपक्रम उपयोगी पडला. त्यांचा शैक्षणिक, भावनिक व सामाजिक विकास होण्यास चालना मिळाली. त्यांच्यात नैतिक मूल्य रुजवण्यात मदत झाली. एकंदर उपक्रम यशस्वी झाला.

**संदर्भ सूची व परिशिष्टे:**

उपक्रमाशी अनुरूप चित्र Google Images या संकेत स्थळावरून वापरण्यात आले.

**शैक्षणिक सत्र २०२२ – २३ (इयत्ता ५ वी)**

| अ क्र | विद्यार्थ्याचे नाव | नवोपक्रमातील विषय व मुल्यांकन | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **निसर्ग** | **नाते संबंध** | **उत्सव** | **आवडीचे पदार्थ** | **सखे सोबती** | **प्राणी** | **माझे अवयव** | **फळे** | **वस्तू** | **ठिकाण** | **वाहने** |
| १ | कु. वेदिका प्रमोद ढोले | ब | क | क | ब | क | ब | ब | ब | अ | ब | अ |
| २ | कु. श्रावणी नितीन सिलस्कार | अ | अ | ब | अ | ब | अ | ब | अ | अ | क | अ |
| ३ | कु. शीतल राजकुमार घाटवाडे | ब | ब | अ | अ | ब | ब | अ | अ | ब | ब | क |
| ४ | कु. हर्षता अनिल नेहारे | अ | क | क | अ | अ | ड | ब | क | अ | अ | ब |
| ५ | कु. नंदिनी विनोद सपकाळ | अ | अ | अ | क | अ | क | अ | अ | अ | ब | क |
| ६ | कु. मैथिली गजानन नेहारे | क | अ | अ | अ | अ | क | ब | क | अ | ब | अ |
| ७ | कु. देवयानी निलेश कुडूपले | क | क | अ | क | अ | अ | अ | क | ब | अ | ब |
| ८ | कु. अविका प्रमोद नारे | अ | अ | अ | ब | अ | ब | ड | अ | ब | क | अ |
| ९ | रिधम अनिल कुडूपले | ब | ब | क | अ | अ | अ | ब | अ | क | ब | ब |
| १० | देवांशु प्रवीण लबडे | अ | अ | ब | ब | क | अ | ब | ब | क | क | अ |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ११ | स्वयंदिप रविंद्र मनोहरे | ब | अ | अ | ड | क | क | क | अ | ब | ब | अ |
| १२ | वेदांत संजय वांदे | अ | ब | क | अ | ब | क | अ | ब | ब | क | अ |
| १३ | वेदांत प्रशांत कडू | अ | अ | क | ब | क | क | अ | ब | ब | अ | क |
| १४ | आयुष मंगेश ठाकरे | ब | ब | क | अ | अ | अ | अ | ब | ब | क | क |
| १५ | मंथन भूषण ढोले | क | अ | ब | ब | ब | क | अ | अ | अ | ब | ब |
| १६ | यश सुनील संतापे | अ | ब | ब | अ | ब | ब | क | अ | अ | अ | ब |
| १७ | सोहम विजय ठाकरे | क | क | अ | ब | ड | क | अ | अ | अ | ब | ब |

## शैक्षणिक सत्र २०२२ – २३ (इयत्ता ६ वी)


| अ क्र | विद्यार्थ्यांचे नाव | नवोपक्रमातील विषय व मुल्यांकन | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | **निसर्ग** | **नाते संबंध** | **उत्सव** | **आवडीचे पदार्थ** | **सखे सोबती** | **प्राणी** | **माझे अवयव** | **फळे** | **वस्तू** | **ठिकाण** | **वाहने** |
| १ | कु. सानिका प्रमोद ढोले | अ | ब | क | अ | ब | ड | अ | अ | अ | क | क |
| २ | कु. खुशी गजानन मोरे | अ | अ | ब | अ | क | ब | क | अ | अ | अ | ब |
| ३ | कु. नमिता विजय खोडे | क | अ | ब | ड | क | क | क | क | अ | क | क |
| ४ | कु. भार्गवी रविंद्र भुंबर | क | क | क | अ | ब | ब | अ | अ | अ | ब | ब |
| ५ | कु. समीक्षा विनोद वरठी | ब | क | अ | ब | ब | क | ब | ब | क | अ | क |
| ६ | कु. जान्हवी प्रेमानंद वाघमारे | क | क | अ | ब | ब | अ | अ | अ | ब | ब | अ |
| ७ | कु. गौरी दिलीप कौरती | अ | अ | अ | ब | ब | क | ब | अ | अ | ब | क |
| ८ | कु. वैष्णवी मारोतराव कांबळे | ब | क | अ | अ | अ | ब | अ | ब | क | अ | ब |
| ९ | भोजराज अरुण नेहारे | ब | क | क | क | क | अ | क | अ | क | ब | अ |
| १० | देवांशु संजय खोडे | अ | ब | ब | अ | ड | अ | ब | ब | क | अ | ब |
| ११ | वेदांत सुभाष गावंडे | ब | ब | क | ब | ब | क | अ | अ | ब | ब | अ |
| १२ | आयुष मोतीलाल भोयर | ब | ब | अ | अ | अ | ब | ब | ब | ब | अ | ब |
| १३ | संकेत प्रशांत तयकित | ब | ब | क | ब | अ | अ | ब | ड | अ | अ | अ |
| १४ | सोहम दीपक वाघ | अ | अ | ब | अ | ब | क | अ | अ | ब | क | ब |
| १५ | मानव राजेश्वर नेहारे | ब | क | अ | अ | अ | क | ब | क | अ | क | ब |
| १६ | चेतन बळवंत येसनसुरे | अ | ब | ब | ब | ब | अ | ब | क | अ | अ | अ |

## शैक्षणिक सत्र २०२२ – २३ (इयत्ता ७ वी)


| अ क्र | विद्यार्थ्यांचे नाव | नवोपक्रमातील विषय व मुल्यांकन | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | निसर्ग | नाते संबंध | उत्सव | आवडीचे पदार्थ | सखे सोबती | प्राणी | माझे अवयव | फळे | वस्तू | ठिकाण | वाहने |
| १ | कु. निशा प्रवीण लबडे | ब | क | अ | अ | अ | क | ब | क | अ | क | ब |
| २ | कु. निकिता सुरेश कातोडे | क | क | अ | ब | ब | अ | अ | अ | ब | ब | अ |
| ३ | कु. तमन्ना रविंद्र मनोहरे | अ | अ | अ | ब | ब | ड | ब | अ | अ | ब | क |
| ४ | कु. दिव्या दिनेश धुर्वे | ब | ब | अ | अ | अ | ब | ब | ब | ब | अ | ब |
| ५ | यश दिलीप कठाने | ब | ब | क | ब | अ | अ | ब | ब | अ | अ | अ |
| ६ | प्रथमेश प्रदीप वाघमारे | अ | अ | ब | अ | ब | क | अ | अ | ब | ड | ब |

### गोषवारा

| इयत्ता | ५ वी | ६ वी | ७ वी |
|---|---|---|---|
| श्रेणी व विद्यार्थी संख्या | १७ विद्यार्थी | १६ विद्यार्थी | ६ विद्यार्थी |
| अ | ७ | ७ | २ |
| ब | ५ | ५ | २ |
| क | ३ | २ | १ |
| ड | २ | २ | १ |



# बालचित्रकाव्य विषय : निसर्ग


जि. प . उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव केंद्र बोरगाव पं. स. आष्टी जि. वर्धा

इयत्ता : ___ नवोपक्रम: बालकाव्य

विद्यार्थ्यांचे नाव: ---------- बैठक क्र. ____

मूळ विषय: निसर्ग


दिलेल्या विषयावर लघु काव्य तयार करा.

पाऊस शब्दयोजन - ---------- अभिप्राय - ----------

झाडे वाक्यरचना - ---------- अभिप्राय - ----------

नदी शब्दयोजन - ---------- अभिप्राय - ----------

नवोपक्रम-बालकाव्य 2022-23



सूर्य शब्दयोजन - ---------- अभिप्राय - ----------

डोंगर वाक्यरचना - ---------- अभिप्राय - ----------

जंगल शब्दयोजन - ---------- अभिप्राय - ----------

नवोपक्रम-बालकाव्य 2022-23

# बालचित्रकाव्य विषय : नातेसंबंध


जि. प . उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव केंद्र बोरगाव पं. स. आष्टी जि. वर्धा

इयत्ता : ___ नवोपक्रम: बालकाव्य

विद्यार्थ्यांचे नाव: ---------- बैठक क्र. ____

मूळ विषय: नातेसंबंध


दिलेल्या विषयावर लघु काव्य तयार करा.

माझी आई शब्दयोजन - ---------- अभिप्राय - ----------

बहिण-भाऊ वाक्यरचना - ---------- अभिप्राय - ----------

मैत्री शब्दयोजन - ---------- अभिप्राय - ----------

नवोपक्रम-बालकाव्य 2022-23


माझे बाबा शब्दयोजन - ---------- अभिप्राय - ----------

मामा वाक्यरचना - ---------- अभिप्राय - ----------

आजी-आजोबा शब्दयोजन - ---------- अभिप्राय - ----------

नवोपक्रम-बालकाव्य 2022-23

## बालचित्रकाव्य विषय : उत्सव

**जि. प . उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव केंद्र बोरगाव पं. स. आष्टी जि. वर्धा**

इयत्ता : ___ नवोपक्रम: बालकाव्य

विद्यार्थ्यांचे नाव: ---------------- बैठक क्र. ____

**मूळ विषय: उत्सव**

दिलेल्या विषयावर लघु काव्य तयार करा.



होळी

शब्दयोजन - ----------

अभिप्राय - ----------



दिवाळी

वाक्यरचना - ----------

अभिप्राय - ----------




नववर्ष शब्दयोजन - ---------- अभिप्राय - ----------



माझा नंदी

शब्दयोजन - ----------

अभिप्राय - ----------



सांताक्लाज

वाक्यरचना - ----------

अभिप्राय - ----------



श्रीगणेश

शब्दयोजन - ----------

अभिप्राय - ----------

नवोपक्रम-बालकाव्य 2022-23

## बालचित्रकाव्य विषय : आवडीचे पदार्थ


**जि. प . उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव केंद्र बोरगाव पं. स. आष्टी जि. वर्धा**

इयत्ता : ___ नवोपक्रम: बालकाव्य

विद्यार्थ्यांचे नाव: ---------------- बैठक क्र. ____

**मूळ विषय: आवडीचे पदार्थ**

दिलेल्या विषयावर लघु काव्य तयार करा.



लाडू

शब्दयोजन - ----------

अभिप्राय - ----------



चकली

वाक्यरचना - ----------

अभिप्राय - ----------



जिलेबी शब्दयोजन - ---------- अभिप्राय - ----------



गुलाब जामून

शब्दयोजन - ----------

अभिप्राय - ----------



आमरस

वाक्यरचना - ----------

अभिप्राय - ----------




श्रीखंड

शब्दयोजन - ----------

अभिप्राय - ----------

नवोपक्रम-बालकाव्य 2022-23

# बालचित्रकाव्य विषय : सखे सोबती


जि. प . उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव केंद्र बोरगाव पं. स. आष्टी जि. वर्धा

इयत्ता : ___ नवोपक्रम: बालकाव्य

विद्यार्थ्यांचे नाव: ---------- बैठक क्र. ____

मूळ विषय: सखे-सोबती


दिलेल्या विषयावर लघु काव्य तयार करा.

सर्जा राजा — शब्दयोजन - ---------- अभिप्राय - ----------

ड्रायव्हर काका — वाक्यरचना - ---------- अभिप्राय - ----------

गुराखी — शब्दयोजन - ---------- अभिप्राय - ----------

नवोपक्रम-बालकाव्य 2022-23



सैनिक — शब्दयोजन - ---------- अभिप्राय - ----------

चित्रकार — वाक्यरचना - ---------- अभिप्राय - ----------

कुंभार — शब्दयोजन - ---------- अभिप्राय - ----------

नवोपक्रम-बालकाव्य 2022-23

# बालचित्रकाव्य विषय : प्राणी


जि. प . उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव केंद्र बोरगाव पं. स. आष्टी जि. वर्धा

इयत्ता : ___ नवोपक्रम: बालकाव्य

विद्यार्थ्यांचे नाव: ---------- बैठक क्र. ____

मूळ विषय: प्राणी


दिलेल्या विषयावर लघु काव्य तयार करा.

गाय — शब्दयोजन - ---------- अभिप्राय - ----------

बैल — वाक्यरचना - ---------- अभिप्राय - ----------

सिंह — शब्दयोजन - ---------- अभिप्राय - ----------

नवोपक्रम-बालकाव्य 2022-23



वाघोबा — शब्दयोजन - ---------- अभिप्राय - ----------

माकड — वाक्यरचना - ---------- अभिप्राय - ----------

कुत्रा — शब्दयोजन - ---------- अभिप्राय - ----------

नवोपक्रम-बालकाव्य 2022-23

# बालचित्रकाव्य विषय : माझे अवयव


जि. प . उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव केंद्र बोरगाव पं. स. आष्टी जि. वर्धा

इयत्ता : ___ नवोपक्रम: बालकाव्य

विद्यार्थ्याचे नाव: ---------- बैठक क्र. ____

मूळ विषय: माझे अवयव


दिलेल्या विषयावर लघु काव्य तयार करा.

जीभ शब्दयोजन - ---------- अभिप्राय - ----------

पाय वाक्यरचना - ---------- अभिप्राय - ----------

दात शब्दयोजन - ---------- अभिप्राय - ----------

नवोपक्रम-बालकाव्य 2022-23



कान शब्दयोजन - ---------- अभिप्राय - ----------

पोट वाक्यरचना - ---------- अभिप्राय - ----------

हात शब्दयोजन - ---------- अभिप्राय - ----------

नवोपक्रम-बालकाव्य 2022-23

# बालचित्रकाव्य विषय : फळे


जि. प . उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव केंद्र बोरगाव पं. स. आष्टी जि. वर्धा

इयत्ता : ___ नवोपक्रम: बालकाव्य

विद्यार्थ्याचे नाव: ---------- बैठक क्र. ____

मूळ विषय: फळे


दिलेल्या विषयावर लघु काव्य तयार करा.

आंबा शब्दयोजन - ---------- अभिप्राय - ----------

चिंच वाक्यरचना - ---------- अभिप्राय - ----------

पपई शब्दयोजन - ---------- अभिप्राय - ----------

नवोपक्रम-बालकाव्य 2022-23



सफरचंद शब्दयोजन - ---------- अभिप्राय - ----------

लिंबू वाक्यरचना - ---------- अभिप्राय - ----------

संत्री शब्दयोजन - ---------- अभिप्राय - ----------

नवोपक्रम-बालकाव्य 2022-23

## बालचित्रकाव्य विषय : वस्तू


जि. प . उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव केंद्र बोरगाव पं. स. आष्टी जि. वर्धा

इयत्ता : ___ नवोपक्रम: बालकाव्य

विद्यार्थ्याचे नाव: ---------- बैठक क्र. ____

मूळ विषय: वस्तू

दिलेल्या विषयावर लघु काव्य तयार करा.

कप

शब्दयोजन -

अभिप्राय -


मोबाईल

वाक्यरचना -

अभिप्राय -

गणवेश शब्दयोजन - अभिप्राय -

नवोपक्रम-बालकाव्य 2022-23


पेन्सील

शब्दयोजन -

अभिप्राय -

चपला

वाक्यरचना -

अभिप्राय -


छत्री

शब्दयोजन -

अभिप्राय -

नवोपक्रम-बालकाव्य 2022-23

## बालचित्रकाव्य विषय : ठिकाण


जि. प . उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव केंद्र बोरगाव पं. स. आष्टी जि. वर्धा

इयत्ता : ___ नवोपक्रम: बालकाव्य

विद्यार्थ्याचे नाव: ---------- बैठक क्र. ____

मूळ विषय: ठिकाण

दिलेल्या विषयावर लघु काव्य तयार करा.

माझी शाळा

शब्दयोजन -

अभिप्राय -


माझे गाव

वाक्यरचना -

अभिप्राय -

बाजार शब्दयोजन - अभिप्राय -

नवोपक्रम-बालकाव्य 2022-23


माझे शेत

शब्दयोजन -

अभिप्राय -

माझे घर

वाक्यरचना -

अभिप्राय -


माझे अंगण

शब्दयोजन -

अभिप्राय -

नवोपक्रम-बालकाव्य 2022-23

# बालचित्रकाव्य विषय : वाहने



जि. प . उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव केंद्र बोरगाव पं. स. आष्टी जि. वर्धा

इयत्ता : ___ नवोपक्रम: बालकाव्य

विद्यार्थ्याचे नाव: ---------- बैठक क्र. ____

मूळ विषय: वाहने

दिलेल्या विषयावर लघु काव्य तयार करा.

सायकल

शब्दयोजन - ----------

अभिप्राय - ----------

बैलगाडी


वाक्यरचना - ----------

अभिप्राय - ----------

विमान

शब्दयोजन - ---------- अभिप्राय - ----------

नवोपक्रम-बालकाव्य २०२२-२३



जहाज

शब्दयोजन - ----------

अभिप्राय - ----------

एस.टी.बस

वाक्यरचना - ----------

अभिप्राय - ----------

आगगाडी

शब्दयोजन - ----------

अभिप्राय - ----------

नवोपक्रम-बालकाव्य २०२२-२३

## ✻ उपक्रमादरम्यान आम्ही सर्व ✻














# विद्यार्थ्यांनी सोडविलेले 'बालचित्रकाव्य' नवोपक्रम विषयानुरूप पेपर शीट



जि. प . उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव केंद्र बोरगाव पं. स. आष्टी जि. वर्धा

इयत्ता : 6वी  नवोपक्रम: बालचित्रकाव्य

विद्यार्थ्यांचे नाव: भोजराज अरूणराव नेहोर  बैठक क्र. 12

**मूळ विषय: निसर्ग**

**दिलेल्या विषयावर लघु काव्य तयार करा.**

रिमझीम रिमझीम येतो पाऊस
धरतीवर सर्वत्र शंखाब पसरवतो पाऊस,
पाऊस गाणी गातो महान
मानव करतो त्याचे गुणगाण.

**पाऊस**

शब्दयोजन - उत्तम

अभिप्राय - अ

झाडाला लागतात सुंदर फुले, फुले तोडायला येतात मुले
दंगा मस्ती करतात मुले, झाडाला बांधतात त्यांचे झुले,
वाऱ्याच्या तालात नाचतात झुले,
झाड करते सर्वांचे भले.

**झाडे**


वाक्यरचना - उत्तम

अभिप्राय - अ

नदी आहे खुप छान
तीच्या लाटा खुप महान,
लोकांना आवडते तिचे काम
होईल ती खूप महान.

**नदी**

शब्दयोजन - बरे  अभिप्राय - क



सूर्य आहे पृथ्वीची शान
पहा त्यांची मैत्री किती छान
सूर्य आहे तेजस्वी कमान
पहा तो किती महान

**सूर्य**

शब्दयोजन - समाधानकारक

अभिप्राय - अ

माझ्या गावात डोंगर सुंदर
तिच्यावर होतात गोळा बंदर
डोंगर आहे कीती छान
पहा त्याची अनोखी शान.

**डोंगर**

वाक्यरचना - चांगले

अभिप्राय - अ


जंगल पहा किती छान
जंगलात आहे प्राण्यांची शान
जंगलात किती प्राणी महान
अशी त्यांची सुंदर कमान

**जंगल**

शब्दयोजन - उत्तम

अभिप्राय - अ

## बालचित्रकाव्य विषय : नातेसंबंध



जि. प . उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव केंद्र बोरगाव पं. स. आष्टी जि. वर्धा

इयत्ता : 5वी  नवोपक्रम: बालचित्रकाव्य

विद्यार्थ्यांचे नाव: मंथन भुषण राव ढोले  बैठक क्र. ----

**मूळ विषय: नातेसंबंध**

**दिलेल्या विषयावर लघु काव्य तयार करा.**

आई आहे माझी खुप छान
मला आहे तीचा अभिमान
ती करते माझा सन्मान
ती आहे खु महान

**माझी आई**

शब्दयोजन - चांगले

अभिप्राय - ब

भावाचं रडवणं बहीणीचा हसवणं
भावाच बोलणं
बहीणीच टोकणं
हे सर्व हवसवाटणं

**बहिण-भाऊ**


वाक्यरचना - समाधानकारक

अभिप्राय -

मित्र म्हणजे एक छान जिव्हाळा असतो.
तीथे कुठलाही खोट नसतो.
तीथे आम्ही मस्त्या करतो
प्रेमाणे एकत्रीत होउन गाणे गातो

**मैत्री**

शब्दयोजन - साजेशी  अभिप्राय - ब



बाबा आमचा आधार तु
मनाने कोमल तु
काळजी घेणारे शरीर तु
प्रेमाच एक मंदीर तु

**माझे बाबा**

शब्दयोजन - छान

अभिप्राय - अ

मामा आहे खुप छान
ते आहे आईचं वरदान.
आई त्यांची बहीण लहान.
मामा माझे खुपच महान.

**मामा**

वाक्यरचना - समाधानकारक

अभिप्राय - ब


आजी आजोबाच्या गोष्टी सुंदर
ते एकतो आम्ही बंदर
बंदर आम्ही खुप सुंदर
ज्वढतो आम्ही सर्वेच डोंगर

**आजी-आजोबा**

शब्दयोजन - उत्तम

अभिप्राय - अ

# बालचित्रकाव्य विषय : उत्सव



जि. प . उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव केंद्र बोरगाव पं. स. आष्टी जि. वर्धा

इयत्ता : 5 वी नवोपक्रम: बालचित्रकाव्य

विद्यार्थ्याचे नाव: श्रावणी नितिनराव शिलसकार बैठक क्र. ____

मूळ विषय: उत्सव

दिलेल्या विषयावर लघु काव्य तयार करा.

आली आली होळी
करू छान छान पुरन पोळी,
रंग उधळू छान होळीचा
आनंद घेऊ छान छान रंगाचा.

होळी

शब्दयोजन - चांगले

अभिप्राय - अ

दिव्यांची आनंदी दिवाळी
आनंदाचा सण दिवाळी,
माझा आवळता सण दिवाळी
सगळ्यांसाठी आनंद घेऊन आली दिवाळी.

दिवाळी


वाक्यरचना - छान

अभिप्राय - अ

आल आल नववर्ष
आम्हाला आहे त्याचा हर्ष,
खाऊ लाडू पापडी मस्त
धिंगाने मस्ती करू जास्त.

नववर्ष

शब्दयोजन - उत्तम अभिप्राय - अ



नंदी पाहा नंदी आहे खूप महान
दिसते तो खुपच छान,
शेतकरी करतो त्याचा सन्मान
लोक गाते त्याचे गुणगाण.

माझा नंदी

शब्दयोजन - उत्तम

अभिप्राय - अ

सांताक्लाज आहे छान फार
तो देतो मुलांना गिफ्ट फार,
सांताक्लाज देतो भरपूर खाऊ
आम्ही दोघे बहीण भाऊ.

सांताक्लाज

वाक्यरचना - चांगले

अभिप्राय - अ


आम्ही करू त्याची आरती
ते आहे गणेश मूर्ती,
आवडते त्याला मोदक फार
घालूत्याला दुर्वांचा हार.

श्रीगणेश

शब्दयोजन - उत्तम

अभिप्राय - अ

# बालचित्रकाव्य विषय : आवडीचे पदार्थ



जि. प . उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव केंद्र बोरगाव पं. स. आष्टी जि. वर्धा

इयत्ता : 1 ली नवोपक्रम: बालचित्रकाव्य

विद्यार्थ्याचे नाव: दिव्या दिनेशराव धुर्वे बैठक क्र. ____

मूळ विषय: आवडीचे पदार्थ

दिलेल्या विषयावर लघु काव्य तयार करा.

लाडू आहे गोल गोल
चव त्याची गोड गोड
लग्नात असते त्याची मोल
हसते किती गोड गोड

लाडू

शब्दयोजन - उत्तम

अभिप्राय - अ

आलिा आली दिवाळी आली
खायला काय केल तर बघुठा बाई.
बघू बघू बघू शेव चिवडा चकली लाडू
दिसते किती छान पाहू

चकली


वाक्यरचना - चांगली

अभिप्राय - ब

रंग बघा रंग नारंगी नारंगी रंग
हा तर बघा जिलेबीचा रंग
गोड गोड जिलेबी
सर्वांना हवी हवी

जिलेबी

शब्दयोजन - बरे+छान अभिप्राय - ब



येता जाता सुटे पाणी
तर काय चव याची
मी कशाला करू मागणी
येता जाता दिसतो गुलाबजामूनी

गुलाब जामून

शब्दयोजन - चांगले

अभिप्राय - ब

आमरस असते आंबट गोड
येता पाऊने पाहुणचाराला त्याचा जोड
दिसायला छान खायला छान
पाहूण त्याला हरपते भान

आमरस

वाक्यरचना - समाधानकारक

अभिप्राय - अ


श्रीखंड मध्ये दुध मिळूनी
त्याच्यात काजू बदाम टाकूनी
ते सगळ मीक्स करूनी
आपण सगळे खाऊ मिळूनी

श्रीखंड

शब्दयोजन -

अभिप्राय -

## बालचित्रकाव्य विषय : ठिकाण



जि. प . उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव केंद्र बोरगाव पं. स. आष्टी जि. वर्धा

इयत्ता : 6 वा नवोपक्रम: बालचित्रकाव्य

विद्यार्थ्याचे नाव: भार्गवी रविंद्र भुंबर. बैठक क्र. ____

मूळ विषय: ठिकाण

दिलेल्या विषयावर लघु काव्य तयार करा.

शाळेच्या भिंती उंच उंच.
तिथे आहे मुलांचा छंद.
शाळा आहे गावाची शान.
आम्ही ठेवतो तिचा मान.

माझी शाळा

शब्दयोजन - उत्तम

अभिप्राय - अ

माझ्या गावात झाडे छान.
तिथे आहे लोक महान.
प्रत्येक घरात आहे राजकारण.
लोक करतात भांडणाचं भांडण.

माझे गाव


वाक्यरचना - चांगले

अभिप्राय - अ

गावात भरतो बाजार मेळा.
तिथे सगळे होतात गोळा.
बाजारात असतो खाऊ.
सगळे मिळून घेऊ.

बाजार

शब्दयोजन - उत्तम अभिप्राय - अ



शेत माझे हिरवेगार.
झाडे आहे सुंदर फार.
शेतकरी करतो शेतावर राज.
तिथे टाकून त्याची बाज.

माझे शेत

शब्दयोजन - उत्तम

अभिप्राय - अ

घर माझे आहे असे.
तिथे प्रेमच प्रेम वसे.
तिथे सगळे एकत्र बसे.
प्रेमाचे गाणे गात असे.

माझे घर

वाक्यरचना - उत्तम

अभिप्राय - अ


अंगणात लागते सुंदर फुले.
फुल तोडायला येतात मुले.
अंगण माझं मोठा फार.
तिथे आम्ही बंदर चार.

माझे अंगण

शब्दयोजन - उत्तम

अभिप्राय - अ

## बालचित्रकाव्य विषय : प्राणी



जि. प . उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव केंद्र बोरगाव पं. स. आष्टी जि. वर्धा

इयत्ता : 5वी नवोपक्रम: बालचित्रकाव्य

विद्यार्थ्याचे नाव: हर्षला अनिलराव नेहारे बैठक क्र. ____

मूळ विषय: प्राणी

दिलेल्या विषयावर लघु काव्य तयार करा.

गाय आहे बैलाची पत्नी
सर्वजण म्हणतात तिला वहीनी
दुध आपुल्याला देते खुप
मला आवडते तिच्या दुधाचे तुप

गाय

शब्दयोजन - समाधानकारक

अभिप्राय - ब

बैल आहे शेतीचा राजा
बैलाचा मित्र सर्जा राजा
पोळा आहे बैलाचा सण
सर्वजण करतात त्याला नमण

बैल


वाक्यरचना - उत्तम

अभिप्राय - अ

सिंहाची दहाड असते खुप मोठी,
चेहऱ्यावर त्याच्या केसू खुपच मोठी मोठी
सर्वजण त्याला खुपच भितात.
पण जंगलात प्राणी त्याला मान देतात.

सिंह

शब्दयोजन - छान अभिप्राय - अ



वाघोबा आहे जंगलाचा राजा
सरवाचां तो वाजवतो बाजा
महाराष्ट्र आहे त्याची शान
सर्वजण ठेवतात त्याचा मान

वाघोबा

शब्दयोजन - समाधानकारक

अभिप्राय - अ

माकड करते झाडावर वार
उड्या मारते उंच फार
झाडाची पाने हीरवी गार
माकड देतो लोकांजवर मार

माकड

वाक्यरचना - व्यवस्थित

अभिप्राय - ब


कुत्रा माझा एकच नंबर
शेतात जायचा बाबा बरोबर
तो करतो शेताची रखवाली
आहे आम्हच्या सोबस त्याची सावली

कुत्रा

शब्दयोजन - चांगले

अभिप्राय - ब

# बालचित्रकाव्य विषय : वस्तू



जि. प . उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव केंद्र बोरगाव पं. स. आष्टी जि. वर्धा

इयत्ता : 6वी

नवोपक्रम: बालचित्रकाव्य

विद्यार्थ्याचे नाव: जान्हवी प्रेमानंद वाघमारे

बैठक क्र. ----

मूळ विषय: वस्तू

दिलेल्या विषयावर लघु काव्य तयार करा.

कप

चहा आणि खारी
कप आणि बशी
अविट अशी चहाची गोडी
काय सांगु ही चहाची चवच लय भारी

शब्दयोजन - उत्तम

अभिप्राय - अ

मोबाईल

मोबाईल आहे एक
करते काम अनेक
जगातली माहिती देतो
आहे तो ग्रेट

वाक्यरचना - उत्तम


अभिप्राय - अ

गणवेश

गणवेश आहे छान
त्याचा आहे छानेला आकार
दिसायला आहे सुंदर फार
गणवेश च्या रंग गुलाबी केशरी छान छान

शब्दयोजन - छान

अभिप्राय - अ



पेन्सील

पेन्सील आहे छान
पेन्सीलच्या रंग काळा लाल
पेन्सील करते लिहिन्याचे काम
शाळेमध्ये असतो तीला मान

शब्दयोजन - चांगले

अभिप्राय - ब

चपला

चपला आहे छान
आहे मोठ्या अनमोल
दिसायला किती छान
करते मोठे काम

वाक्यरचना - समाधानकारक छान

अभिप्राय - ब


छत्री

छत्री आहे पाण्याची ढाल
छत्रीचा रंग लाल लाल
छत्रीची आहे वेगळीच कमाल

शब्दयोजन - चांगले

अभिप्राय - ब

# बालचित्रकाव्य विषय : सखे सोबती



जि. प . उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव केंद्र बोरगाव पं. स. आष्टी जि. वर्धा

इयत्ता : 7वी

नवोपक्रम: बालचित्रकाव्य

विद्यार्थ्याचे नाव: तमन्ना रविंद्रराव मनोहरे.

बैठक क्र. ----

मूळ विषय: सखे-सोबती

दिलेल्या विषयावर लघु काव्य तयार करा.

सर्जा राजा

सर्जा राजा काम तुझे महान
लोक गाते तुझे गुणगान
तू आहे शेताची शान
कामे तुझे सर्वात छान

शब्दयोजन - उत्तम

अभिप्राय - अ

ड्रायव्हर काका

ड्रायवर काका ड्रायवर काका गाडी चालवतात.
लाल दिवा लागताच गाडी थांबवतात
हिरवा दिवा लागताच गाडी पळवतात
आम्हाला गावाला नेऊन देतात

वाक्यरचना - छान


अभिप्राय - अ

गुराखी

गुराखी नेतो गाई जंगलात
तो जाते गाणे गात गात
रानातील फळे खात खात
तो जाते जंगलाच्या आत

शब्दयोजन - समाधानकारक

अभिप्राय - ब



सैनिक

सैनिक आहे खूप छान
करते आपल्या देशासाठी जिवाचे रान
दिले देश भक्तांनी आपले प्रान
म्हणून आहे ते महान.

शब्दयोजन - चांगले

अभिप्राय - अ

चित्रकार

तू आहे चित्रकार. चित्र तुझे सुंदर फार
चित्र दिसायला शानदार. त्यात आहे जादू फार
चित्र आहे मजेदार. मन होते तजेलदार
चित्र आहे रंगदार. तू आहे कीती कलाकार

वाक्यरचना - उत्तम

अभिप्राय - अ


कुंभार

त्याचे काम मोठे फार
तो आहे एक कुंभार
तो बनवते मडकी फार
माती आहे चिकणी गार

शब्दयोजन - समाधानकारक

अभिप्राय - ब

# बालचित्रकाव्य विषय : वाहने


जि. प. उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव केंद्र बोरगाव पं. स. आष्टी जि. वर्धा

इयत्ता : 7वी नवोपक्रम: बालचित्रकाव्य

विद्यार्थ्याचे नाव: तमन्ना रविंद्र मनोहरे बैठक क्र. ____

मूळ विषय: वाहने

दिलेल्या विषयावर लघु काव्य तयार करा.

सायकल माझी मोठी फार.
आम्ही होतो तिच्यावर स्वार.
सायकल म्हणते पायडल मार.
आता तरी चालूद नको कार.

सायकल

शब्दयोजन - उत्तम

अभिप्राय - अ

बैलगाडि ही शेतकरी दादाची
आवड आहे. मला बैलगाडिची
बैलगाडी मध्ये बसुन वाटते आनंद
बैलगाडी चालवण्याचा मला छंद


बैलगाडी

वाक्यरचना - सानेशी - छान

अभिप्राय - अ

विमान दिसते आकाशात महान
त्याची आहे वेगळी शान
विमान चालवणारे पायलट आहे महान
भारताला आहे त्यांचा अभिमान

विमान शब्दयोजन - उत्तम अभिप्राय - अ


इंग्रजी मध्ये म्हणतात जहजाला शीप
जहाजावर येते सुंदर स्लीप
आम्ही करतो त्याच्यावर ट्रीप
जहाज होते पाण्यावर स्लीप

जहाज

शब्दयोजन - उत्तम

अभिप्राय - अ

बस आहे गावाची शान
आम्हांला आहे तिचा अभिमान
आम्ही गातो तिचे गुणगान
ती आहे खुप वेगवान

एस.टी.बस

वाक्यरचना - उत्तम

अभिप्राय - अ


धावत फिरते गावच गाव
हुंदडत फिरते गावच गाव
तिला न अडवी नदी पहाड
टाटा म्हणते झाडझाड

आगगाडी

शब्दयोजन - उत्तम

अभिप्राय - अ

# बालचित्रकाव्य विषय : फळे


जि. प. उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव केंद्र बोरगाव पं. स. आष्टी जि. वर्धा

इयत्ता : 7वी नवोपक्रम: बालचित्रकाव्य

विद्यार्थ्याचे नाव: निशा प्रविणराव लबडे बैठक क्र. ____

मूळ विषय: फळे

दिलेल्या विषयावर लघु काव्य तयार करा.

आंब्याची अमराई दुरून दुरून
आंबा येतो गाडि भरून भरून
आंबा खावा चुरून चुरून
सज्या येईल आपल्याला भरून भरून

आंबा

शब्दयोजन - उत्तम

अभिप्राय - अ

चिंचीला चिंचा खुबकेदार
आईला आवडते चिंचा फार
चिंचा असते आंबट गोड रसदार
चिंचिला पाहुण तोंडाला सुटते पाणि फार


चिंच

वाक्यरचना - उत्तम

अभिप्राय - अ

पपई आहे पिवळीगार
आजारी लोकांना देते आधार
पपई आहे थंडीफार
पपई खाऊन उध्यामार

पपई शब्दयोजन - चांगले अभिप्राय - अ


आपल्या खाऊ वाटतांना होतो आनंद
सफरचंद आहे जीवनाचा गुलकंद
सफरचंद खाणे आहे माझा छंद
ते खाऊन माझे मन होते मंद

सफरचंद

शब्दयोजन - छान

अभिप्राय - अ

लिंबू आहे पिवळेगार
दिस्यायला ते गोलफार
लिंबू आहे चवदार
चव त्याची आंबट फार

लिंबू

वाक्यरचना - उत्तम

अभिप्राय - अ

संत्रीची चव आंबट गोड
नारंगी आहे त्याची फोड
लोक करतात त्याची तोड
संत्याला नाहि कुणाचा जोड

संत्री

शब्दयोजन - उत्तम

अभिप्राय - अ

**जि. प . उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव केंद्र बोरगाव पं. स. आष्टी जि. वर्धा**

इयत्ता : ६वी    नवोपक्रम: **बालचित्रकाव्य**

विद्यार्थ्याचे नाव: भोजराज अरूणराव नेहारे.    बैठक क्र. ____

## मूळ विषय: भारतातील महान व्यक्तिमत्व

**दिलेल्या विषयावर काव्य तयार करा.**




### छत्रपती शिवाजी महाराज

इतिहासाच्या पानोपानी शौर्य माझ्या
शिवरायाचे गाजते,
प्रत्येक लोकांच्या मनामध्ये रक्त मराठी
सळसळते.
शिवराय होते माझे रयतेचे राजे
सर्वत्र जगभर त्यांचे नाव गाजे
त्यांच्या जयंती च्या दिवशी ढोल नगारे वाजे
त्या दिवशी लोक आनंदाने एकत्र होऊन नाचे
शिवराय आहे माझे लाखात एक
इरादे होते त्यांचे नेक
माझ्या शिवबाजवळ होते मावळे खूप सारे
त्यांच्या समोर झुकते चंद्र, सूर्य, तारे,
येकुनी राम कृष्णाच्या गाथा
टेकविला त्यांनी माता भवानी समोर माथा
संपूर्ण देशभरात होतो त्यांचा जन्मदिवस साजरा
माझ्या राजाला माझा मानाचा मुजरा

!! जय भवानी ! जय शिवाजी !!


शब्दयोजन - योग्य    **अभिप्राय** - उत्तम

## राष्ट्रपिता महात्मा गांधीजी (बापू)



माझा बापु संपूर्ण देश स्वातंत्र्य करून
गेला
आपल्या जवळचे ज्ञान दुसऱ्याला देवून
तो स्वर्गात गेला.

माझ्या बापूंनी केला सत्याग्रह मिठाचा
मोठ्या मनाने केला त्यांनी विकास देशाचा.
हर एका नोटेवर असते माझ्या बापूचे चित्र
त्यांनी घडविले देशाचे जीवन चरित्र
बापु माझे सेवाग्राम आश्रमात राहायचे
प्रत्येक मनुष्याच्या मनामध्ये नाव त्यांचे यायचे
माझ्या बापूची कीर्ती जगभर पसरली
त्यांच्यामुळे आज रानोरानी फुले बहरली
माझ्या बापुच्या अंगावर राहायचे
खान वस्त्र
ते होते पुतळाबाईचे पुत्र



शब्दयोजन –  अभिप्राय –

**जि. प . उच्च प्राथमिक शाळा, बोरगाव केंद्र बोरगाव पं. स. आष्टी जि. वर्धा**

इयत्ता : 7वी

नवोपक्रम: **बालचित्रकाव्य**

विद्यार्थ्याचे नाव: तमन्ना रविंद्रराव मनोहरे बैठक क्र. 3

## मूळ विषय: भारतातील महान व्यक्तिमत्व




**दिलेल्या विषयावर काव्य तयार करा.**

### छत्रपती शिवाजी महाराज

शिवराय होते रयतेचे राजे
जेव्हा बसले ते सिंहासनावर तेव्हा
मावळ्यांनी वाजवले वाजे
शिवरायाचं नाव जिथे तिथे गाजे.
शिवाजी राजे होते जगात एक
ते होते खूप नेक
लढाया जिंकल्या त्यांनी अनेक
लोकांनी नेहमी ठेवावा त्यांचा मान
कारण ते होते संपूर्ण महाराष्ट्राची शान
स्वराज्यासाठी त्यांनी दिले आपले प्राण
कितेक मावळ्यांनी दिले आपले बलिदान
म्हणूनच संपूर्ण जग गाते त्यांचे गुणगान.
चमचम तळपत होती माझ्या शिवबाची तलवार,
त्यांच्या तलवारिवर होता शत्रूंचा भार.
शिवराय आले जन्माला जिजाऊच्या पोटी
त्यांना माझा प्रणाम कोटी कोटी.
जय शिवराय.....

**शब्दयोजन** - उत्तम **अभिप्राय** - सुंदर

## राष्ट्रपिता महात्मा गांधीजी (बापू)




केली त्यांनी शांततेची कामना
जागवली त्यांनी मनात स्वातंत्र्याची
भावना.

बापू तुम्ही महात्मा
भारताच्या भविष्यासाठी तुमची अमर आत्मा
लोक म्हणायचे आले आपल्या भूमीवर परमात्मा
महात्मा गांधी होते महात्मा

महात्मा गांधींनी दिला सत्यमेव जयतेचा
जगाला मंत्र,
मिळवून दिले त्यांना खरे मानवतेचे
स्वतंत्र्य.

महात्मा गांधी घालायचे धोती
त्यांनी दिली आपल्या प्राणांची आहुती.



शब्दयोजन – अभिप्राय –